आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ ऑगस्ट २०२५

ठळक बातम्या

- माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं निधन
- रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून गेल्या १६ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख जणांना रोजगार मिळाला असल्याचं सरकारचं लोकसभेत निवेदन
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७ मधल्या ओबीसी आरक्षणानुसार घेण्यात येणार असल्याची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून मुंबईत सुरू

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन- तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारताचा रोमहर्षक विजय, मालिका बरोबरीत सुटली

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं आज नवी दिल्लीतल्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते ८१ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंड विकारावर उपचार घेत होते.

शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते. दुमका मतदारसंघातून ते तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. तर दोन वेळा राज्यसभेचे सदस्य होते.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. संथाल जमातीतले सोरेन यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी दीर्घ लढा दिला होता. झारखंडचं मुख्यमंत्रीपद त्यांनी तीन वेळा भूषवलं.

झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होते. शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल झारखंडमधे तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाला असून झारखंड विधानसभेचं अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं आहे. त्यांचं पार्थिव आज रांचीला नेण्यात येणार आहे.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी सर गंगाराम रुग्णालयात जाऊन शिबू सोरेन यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं, तसंच हेमंत सोरेन यांचं सांत्वन केलं.

सोरेन यांचं निधन हे सामाजिक न्यायाच्या क्षेत्राचं मोठं नुकसान आहे. सोरेन यांनी आदिवासींना ओळख मिळावी म्हणून आणि झारखंड राज्याच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. तर, सोरेन हे आदिवासी समुदाय, गोरगरीब आणि दलितांचं सक्षमीकरण करणारे नेते होते, अशा शोकभावना प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केल्या आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही सोरेन यांना आदरांजली वाहिली. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी हेमंत सोरेन यांना पत्र लिहून शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

सोरेन यांच्या निधनामुळे झारखंडने एक पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आणि एक कुशल संसदपटू गमावल्याची भावना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केली आहे.

<><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं.

राज्यसभेत आज सकाळी कामकाज सुरु झाल्यावर सर्व सदस्यांनी दिवंगत माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर सोरेन यांच्या सन्मानार्थ सदनाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेतही सर्व सदस्यांनी दिवंगत नेते शिबू सोरेन यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर सदनाचं कामकाज सुरु झालं.

रोजगार मेळयात मागच्या १६ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख जणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत, एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार गेल्या दशकात १७ कोटीहून अधिक युवकांना रोजगार मिळाला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. युपीए सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात रोजगाराच्या केवळ ३ कोटी संधी निर्माण झाल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजने अंतर्गत येत्या ५ वर्षात ४ कोटीहून अधिक रोजगार संधी निर्माण करण्यासाठी सरकारनं २ लाख कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, असंही त्यांनी सांगितलं.

देशातल्या बेरोजगारांचं प्रमाण ३ पूर्णांक २ दशांश इतकं खाली घसरलं असून ते अनेक विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी आहे, असं ते म्हणाले.

दरम्यान, बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षण मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ सुरू केल्यानं सदनाचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. पुन्हा कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षांनी याच मुद्द्यावर चर्चा करावी अशी मागणी करत हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरु केली. त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्यानं सभापती ओम बिर्ला यांनी सदनाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

<><><><><>

फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डीनांद मार्कोस ज्यूनियर यांचं आज राजधानी दिल्ली इथं आगमन झालं. परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पबित्र मार्गेरिटा यांनी त्यांचं स्वागत केलं. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांची मार्कोस यांनी भेट घेतली. मार्कोस उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

भारत आणि फिलीपिन्स यांच्या द्विपक्षीय संबंधांना यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्या पार्श्वभूमीवर ही भेट होत आहे. दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी ही भेट महत्त्वाची ठरेल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

<><><><><>

औषधी वनस्पतींच्या संवर्धनासाठी आणि त्याबद्दल जनजागृतीसाठी आयुष मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळानं आज नवी दिल्लीत दोन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी आयुषमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते.

<><><><><>

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७ मधल्या स्थितीनुसार ओबीसी आरक्षणानुसार घेण्यात येणार आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ च्या प्रभाग रचनेनुसार घ्याव्या, अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली असल्याने २०१७ मधल्या ओबीसी आरक्षणानुसार सर्व जिल्ह्यांमधे निवडणुका होतील, असं ते म्हणाले......

मुंबई महानगर क्षेत्रातल्या आणि इतर अशा ३३ पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांचा आढावा आजच्या वॉररूम बैठकीत घेण्यात आला. मुंबईतली वाहतुकीची समस्या सोडवण्याच्या दृष्टीनं विविध उपाययोजना शासन करत आहे असं त्यांनी सांगितलं. त्यात मल्टीमोडल कॉरिडॉर, मेट्रो प्रकल्प नवीन रस्त्यांवरचे बोगदे अशा कामांचा समावेश होता. वर्धा-गडचिरोली आणि वर्धा - नांदेड रेल्वे प्रकल्पांना गती देण्याबाबत तसंच पुणे रिंगरोड, आणि मेट्रो प्रकल्प पुढे नेण्याबाबत, त्याचप्रमाणे बीडीडी चाळी, तसंच धारावी पुनर्विकास या प्रकल्पातल्या अडचणींविषयी बैठकीत चर्चा झाली. मुंबईतले कबुतरखाने तसंच नांदणीतल्या हत्तिणीचं पुनर्वसन या संदर्भात न्यायालयाचे आदेश असले, तरी जनभावना लक्षात घेऊन काही उपाय करता येईल का याविषयी चर्चा करण्यासाठी उद्या बैठक बोलावली असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती येत्या बुधवारी पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करेल. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पत पुरवठ्याला चालना देण्यासाठी रेपो दरात पाव टक्के कपात होण्याची शक्यता भारतीय स्टेट बँकेनं वर्तवली आहे. मात्र सलग तीन वेळा व्याज दर कमी केल्यामुळे आता रिझर्व्ह बँक व्याज दरात बदल करणार नाही, असं मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन- तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेतला अखेरचा आणि पाचवा सामना आज भारतानं सहा धावांनी जिंकला. विजयासाठी ३७४

धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लंडचा दुसरा डाव ३६७ धावात आटोपला. ५ गडी बाद करणारा मोहम्मद सिराज हा भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला. तोच सामनावीर ठरला. या विजयामुळे ही मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली.

लंडनच्या ओव्हल मैदानावर आज पाचव्या दिवशीचा खेळ सुरू झाला तेव्हा ६ बाद ३४७ या कालच्या धावसंख्येवरून इंग्लंडनं खेळायला सुरूवात केली. त्यांना विजयासाठी अवघ्या ३५ धावा हव्या होत्या. हे आव्हान ते सहजपणे पेलतील असं वाटत असतानाच पुढच्या सात धावांत त्यांचे तीन गडी तंबूत परतले आणि सामना रंगतदार अवस्थेत पोचला. त्यानंतर विजयासाठी अवघ्या २० धावा हव्या होत्या आणि त्यांचा एक गडी बाकी होता. सिराजनं टाकलेल्या सुरेख बॉलवर गस अटकिनसन बाद झाला आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब झालं.

//<><><><><>//